# वाट स्वप्नांची

संथ संथ होत गाडी स्टेशनवर थांबली. आपलं सामान घेऊन शामनी फलाटावर उडी मारली. एक जोरदार आळस देत आपल्या प्रवासानं आखडलेल्या शरीराला जरा मोकळं केलं. इकडे तिकडे नजर फिरवली. चार सहा तुरळक डोकी फलाटावर उतरली होती. बरोबरच आहे ना, या आडगावात तसं येणार तरी कोण म्हणा? त्याच्या मनात आलं. आपण इथे येऊन काही चुकीचा तर निर्णय नाही ना घेतला? एक क्षणभर त्याच्या मनात विचार आला. पण विचारासरशी डोकं झटकून त्यानी तो तसाच पळवून लावला.

आपलं सामान उचलून इकडे तिकडे पहात शाम सरळ स्टेशनबाहेर आला. आता सामान म्हणजे तरी काय, तर एक छोटी बॅग आणि पाठीला एक सॅक. बस्स एवढंच. बाहेर येऊन एकवार सभोवती नजर टाकली. मार्च महिन्याची नुकती सुरुवात पण उन्हं आत्तापासूनच मी म्हणायला लागली होती. उन्हाच्या झळा चांगल्याच जाणवत होत्या. "यावेळचा हा उन्हाळा चांगलाच भाजून काढणार बहुतेक..." त्याने मनाशी खूणगाठ बांधली. काही वाहन मिळतंय का, हे बघण्यासाठी आजूबाजूला नजर फिरवली.

एकुलती एक रिक्षा तेवढी उभी होती. रिक्षावाला ही असं कोण मोठं रिक्षानी जाणार गिऱ्हाईक मिळणार? या विचाराने स्टेशन समोरच्या छोट्याश्या चहाच्या टपरीवर गप्पा छाटत निवांत बसला होता. शामला बघून उरलेला चहा एका घोटात संपवत घाईघाईने पुढे आला.

"काय साहेब, कुठसी जायाचं हाय...."

"रामवाडी" शाम म्हणाला. "चला" म्हणत रिक्षा निघाली. दूरवर पसरलेल्या माळरानावर नजर फिरवताना त्याच्या मनावर एक प्रकारचं दडपण आलं. रखरखीत माळरान. अधूनमधून

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

दोन चार झाडं आणि एखादा शेतीचा तुकडा. तेवढंच काय तो डोळ्याला दिसावा. एकंदरीत गावातलं पाण्याचं दुर्भिक्ष जाणवत होतं. तशी गावाला नदी लाभली होती पण पूर्वी चांगलं लांबरुंद असलेलं नदीचं पात्र गेल्या काही वर्षातील सिमेंट कॉन्क्रीटच्या भरावानं आक्रसत गेलं होतं. आता त्या नदीला जेमतेम एखाद्या ओहळाचं स्वरूप आलं होतं. समोर पसरलेल्या त्या माळरानाकडे बघता बघता चारच दिवसांपूर्वीचा तो प्रसंग शामच्या डोळ्यासमोर आला.

चांगली MSC ची डिग्री. पक्का प्राइव्हेट कंपनीत एक्सिक्युटिव्हचा चांगला जॉब. दोन वर्ष पूर्ण झाली होती. तसा शाम साहेबांचा अगदी लाडका नसला तरी त्याच्या कामावर वरिष्ठ अधिकारी नाराज तरी नक्कीच नव्हते. दोनतीन वर्षात बढती मिळून असिस्टंट मॅनेजर बनण्याचा चान्स. आता लवकरच सूनबाई आणून, तिच्या हाती संसार सोपवून, नातवंड मांडीवर खेळवत निवांत आयुष्य जगण्याचं स्वप्नं आईबाबांच्या डोळ्यात. सारंच कसं सुरळीत चालू होतं.

मात्र शामच्या मनात काही वेगळेच विचार. त्या शहरात त्याचं मन कधीच फारसं रमलं नव्हतं. ती गर्दी, घाई गडबड, दगदग त्याच्या शांतताप्रिय मनाला कधीच भावली नव्हती. लहानपणीचे गावचे दिवस डोळ्यासमोर येत राहात. त्या आठवणींच्या भोवऱ्यात मन सतत गावातच पिंगा घालत राही. गेल्या काही वर्षात गावी जाणं झालंच नव्हतं फारसं..... काय करावं? या विचारात काही दिवस घालवल्यावर त्यानं स्वतःशी काहीतरी निर्णय घेतला. रात्रीचं जेवण झाल्यावर बापाजवळ गेला.

"बा, मी नोकरी सोडतोय"

निवांत पानाची चंची सोडून बसलेला बा ह्याचं बोलणं ऐकून उडालाच. तोवर माय पण मागचं सारं आवरून

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

फडक्याला लाल पुसत खोलीच्या दाराशी येऊन उभी राहीली होती.
"आणि करणार काय? दुसरी कुठली चांगली नोकरी गावली व्हय?" बानी विचारलं
"मी गावी जायचं म्हणतोय."
आता हे काय नवीन विपरीत? असा विचार करत बा म्हणाला "अरं, चांगलं शिक्षण, चांगली नोकरी हाय, चांगला पैका बी मिळतोया, अन् ती सोडून ह्यो मिकचे डोहाळं काढून लागले तुन्सी!"
"माझं मन नाय रमत इथं". अन् गावात जाऊन करणार काय?" बानी विचारलं.
"शेती" शाम म्हणाला.
"अशी काय बापजाद्यांनी मोठी जमीन ठेवलीया. दोन तीन चार साडेचार एकराचा तुकडा त्यो. आणि त्या दगडधोंड्यात हाय काय? एकुलती एक हिर. ती बी कोरडी ठाक. अरं, शेतीत काय बी दम राहीला नाय म्हणून तर तुला घेऊन धा सालामागं शहर गाठलं नव्ह म्या. हातापायी भक्कम गडी तवा रखवालदार म्हणून इथं फॅक्टरीत काम गावलं. तुझ्या मायनी चार घरी राबून दिलं. आता जरा सुखाचे निवांत दिस आलेत तर तुझं कायतरी वंगाळच." असं म्हणून बानी डोक्याला हात लावला, मायनी पण डोळ्याला पदर लावला.
पण शामचा निर्णय आता पक्का होता. चार दिवसात नोकरीचा राजीनामा देऊन बॅग भरली, उचलली आणि निघाला.
"साहेब, रामवाडी" रिक्षावाल्याचा आवाज आला तसा शाम भानावर आला. भाडं चुकतं करून उतरला. गाव तर बराच अनोळखी वाटत होता. पूर्वीच्या काही पुसटश्या खुणा दिसत होत्या तेवढ्याच. आता तसं ओळखीचं फारसं कोणी नव्हतच गावात. शेतीत राम नाही म्हणून बरेचशी

तरुण पिढी मिळेल ते काम करत शहरात स्थायिक झाली होती. आजूबाजूची शेतही शांत आणि सुनसान भासत होती. शामनी सरळ शेताची वाट धरली. शेताजवळ पोचला.

शेताच्या सुरुवातीलाच बांधून घेतलेल्या तीन खोल्या मात्र अजून चांगल्या अवस्थेत दिसत होत्या. एक गडी महादू आणि त्याची बायको रखमा तिथे रहात असत. घराची आणि शेतीची देखभाल तेच करीत. पूर्वी कुठेतरी लावलेल्या चार सहा आंब्यांच्या झाडांवर लागणारे आंबे आणि पावसाच्या मर्जीवर अवलंबून अध्याएक एकरात लावलेला भात यावर त्या कुटुंबाची गुजराण होत होती. दरवर्षी आंब्याची पेटी आणि दोन पोती तांदूळ मात्र महादू न चुकता शहरात पाठवत असे.

आपल्या धाकल्या मालकाला असं अचानक आलेलं पाहून त्याला नवल वाटले. चहापाणी झाल्यावर विचारलं,

"असे अचानक आलात मालक, समदं ठीक हाय नव्हं?"

"हो महादू. पण मी आता इथेच गावात राहायचा आणि शेतीत लक्ष घालायचा विचार करतोय." शाम म्हणाला.

"लई बेस बगा, नुसती पडून हाय जमीन. तुमीच बगा आता काय ते."

दुसऱ्या दिवशी सकाळी महादूला बरोबर घेऊन शामनी शेतावर चक्कर मारली. कोठेही झुडुप, रानटी झाडं, दगडधोंडे, काटेकुटे बऱ्याचशा भागात पसरले होते. तणही माजलं होतं.

बरीच मेहनत करावी लागणार एकंदरीत, शामनी मनाशी खूणगाठ बांधली.

"साहेब, इथे पाण्याची वानवाच हाय. पाऊस बी लहरी. कधी चांगला पडलाच तर मिळतं काहीबाही. नाहीतर समदा आनंदच."

"काय रे इथे पाण्याची लाईन मिळायची काही सोय?"

FOR EDUCATIONAL USE

"आता तुम्हीच बघा काय ते. मला काय त्यातलं समजतं नाय. काय लागेल ती मदत करीन. पण तुम्हालाच बघावं लागेल सारं. पाणीखात्यात अर्ज करावा लागेल."

आता श्याम कामाला लागला. ग्रामपंचायतीच्या कचेरीत गेला. एकलता एक प्यून आरामात पाय पसरुन खूर्चीवर झोपला होता. बाकी सारा शुकशुकाट. जोरात हाक मारुनही त्याच्या डोळ्यावरची झोप काही उडेना. शेवटी हलवून जागं केलं. डोळे चोळत चोळत कसबसं त्यानी सांगितलं "हे काम इथलं नव्हं. तालुक्याला जावं लागेल तुम्हास्नी."

श्यामनी कंबर कसली. मग सुरु झाल्या तालुक्याच्या ठिकाणी फेऱ्या. बरं, तालुक्याच्या गावी जायला दिवसातून जेमतेम दोनदा बस सुटणार. सगळंच त्रांगडं. पण करता काय? आलीया भोगासी म्हणत श्याम कामाला लागला. हा अर्ज द्या. हे कागद आणा. हा उतारा लागेल, असं करता करता पंधरा दिवस निघून गेले.

त्यानंतर सरकारी कामकाज. आज हा साहेब नाही. उद्या तो नाही. वरच्या खात्यात गेलाय अर्ज पण तो साहेब सुट्टीवर आहे. होईल काम पण जरा वेळ लागेल. अशी टाळवाटाळवी. खिसा जरा गरम केल्यावर थोडीफार हालचाल होई. पण परत ह्येच ये.... प्रायव्हेट कंपनीत काम केलेल्या श्यामला या गोष्टींची फारशी सवय नव्हती. आधी वादाविवाद मग विनवण्या ह्यात चांगला महिना दिड महिना आणि पंचवीस तीस हजारांचा चुराडा, ह्या व्यतिरीक्त फारसं काही हाती लागलं नाही.

तो निराश झाला. दोन वर्षांच्या नोकरीत साठवलेली पुंजी आणि सोडताना मिळालेली काही रक्कम असं मिळून ते काही चार साडेचार लाख रुपये होते त्यावरच त्याची मदार होती.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

एप्रिल महिना सरत आला. अजून काही खास असं काम झालंच नव्हतं. पाण्याच्या लाईनचा अर्ज अजून सरकार दरबारी तसाच पडून होता. अजून शेतावर माजलेलं रान साफ करायचं. जमीन करायची. बी बियाणं. खतं.... कसं काय होणार सगळं, पैशाचं गणित तरी कसं बसवायचं? हा म्हणत होता तेच खरं. पाणीच नाही तर कसली शेती अन कसलं काय? सरळ उठून परत शहर गाठावं. मिळेल नोकरी कुठतरी. ह्या बिनबुडाच्या स्वप्नालाही काहीच अर्थ नाही." शामच्या मनात विचार.

महादूच्या अनुभवी आणि चाणाक्ष नजरेतून मालकाची चलबिचल सुटली नव्हती.

"मालक बेचैन दिसता. जमीन आई आपली. आईवाणी ती बी परीक्षा घेत असेल. पण तिच्याही पोटात माया असेल. नक्की होईल सगळं ठीक."

"नाही महादू, मला नाही वाटत आता पाण्याचं काही होईल. किती योजना आखल्या होत्या. चांगलं खत घालू. जमीन करू. थोडफार पाणी मिळालं तरी नीट नियोजन करून दोन एकरात भात, एखाद्या एकरात भाज्या लावू. ठरलेल्या जागेत आणखी आंब्याची, फणसाची झाडं लावायची. सगळंच स्वप्न अपूर्ण राहिली. आणि असं काय अवास्तव मागणं होतं माझं? गावापर्यंत असलेली पाण्याची लाईन थोडीशी पुढे वाढवून शेतापर्यंत मिळावी एवढंच ना. काहीच अर्थ नाही उरला आता. आता शहराची वाट धरावी हेच उत्तम."

"चला मालक, जरा शेतात चक्कर मारून येऊ. आल्यापासू तुमच्या पायाला भिंगरी लावल्यागत फिरताय. जरा पाय बी मोकळं होतील अन मनाला जरा विसावा बी मिळेल."

"बरं चल," असं म्हणत शाम उठला. सगळ्या शेतात एकवार चक्कर मारली. मनात आलं 'ती

मजूरांनी परत, कुदळी सरसावल्या. घाव घातला.
'घण, घण' कुदळ कशावर तरी आपटली. जोराचा आवाज झाला. सर्वांनी पाहिलं तर एक मोठा दगड. त्यावर कुदळ आपटून आवाज येत होता. मजूरपण निराश झाले. दगडात कुठलं पाणी लागायला.

रागानी शिवी घालून एकच जोराचा घाव त्यांनी त्या दगडावर मारला.

निराशा, घोर निराशा पदरी पडली होती. मध्येच हा मोठा दगड. आता कुठून पाणी मिळणार. दोन्ही हातांनी चेहरा झाकून शामनी मातीतच बसकण मारली. अश्रूंनी त्याचे डोळे डबडबले. सर्वच संपलं होतं. आणखी दहा हजारांचा चुराडा होण्यापेक्षा काहीच हाती लागलं नव्हतं. त्याची सर्व स्वप्नं आता भंगली होती. कोणत्या तोंडाने आता बायको समोर जाणार. काय ठरवलं आणि काय झालं.

"मालक, मालक" महादूच्या हाका कानावर येत होत्या. पण डोळे उघडून पाहण्याची इच्छा काही राहिली नव्हती. कोणाची सहानभूतीही नको होती त्याला याक्षणी.

"मालक, पहा तरी, काय ह्या चमत्कार...." महादू त्याला हलवत म्हणाला. डोळे उघडून महादूकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता.

'मालक, विहिरीत डोकावून तर पहा.'

बघतो तर काय, मजूरांनी आवेशानी मारलेल्या एकाच घावामुळे दगड थोडासा हलला होता. त्याचा एक मोठा कपचा तुटून बाजूला पडला होता आणि त्यामागून झिरपत होती एक छोटीशी करंगळी एवढी पाण्याची धार.....

आनंद अतीव आनंद.... काही वेळापूर्वीचे दुःखाश्रू आता आनंदाश्रूत बदलले होते. त्याच्या स्वप्नांची

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

वार त्याला खुणावत होती. अन् निराशेच्या घोर
अंधःकारात आशेचा एक किरण चमचम करीत होता...
आणि त्या किरणाच्या प्रकाशात स्वप्नांच्या वाटेवर त्यांचं
पहिलं पाऊल पडलं होतं.

—x—

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner